e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# पटकथा निर्मिती प्रक्रिया

**डॉ. संगीता घुगे**
मराठी विभाग
शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर
जि.नांदेड

**DOI:** https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.42

**उद्दिष्ट्ये:**

१. पटकथा व्याख्या

२. पटकथा निर्मिती प्रक्रिया आढावा

३. पटकथेची सुरुवात कशी करायची?

४. मुख्य घटक

५. संकल्पना

**प्रस्तावना:**

**पटकथेचे लेखन करणे हे एक कौशल्य आहे. हे लेखन करताना लेखकाला पूर्वतयारी करणे आवश्यक असते. उतम दर्जाच्या पटकथा लिहिताना, या पूर्व तयारीचा उपयोग होतो. यासाठी पटकथा लेखकांनी स्वतःस काही प्रश्न विचारणे आवश्यक असते व त्याची उत्तरे या माध्यमातून दिली तर पटकथेचा दर्जा सुधारतो; यातून पटकथा लेखकाची सर्जनशीलता दिसून येते.**

**सृजनशीलता म्हणजे काय:**

"Solution to problem is creativity."अर्थात इथे प्रश्नांना उत्तरे देणे म्हणजे सृजनशीलता होय. लेखकाच्या मनात याविषयी जे प्रश्न निर्माण होतील. ती उत्तरे देण्याचा आणि शब्दात मांडण्याचा प्रयत्न अर्थात लेखकाच्या प्रतिभेचा शोध घेणे होय. सर्जनशील लेखक हा उतम पटकथाकार होऊ शकतो.त्यासाठी पटकथा म्हणजे काय? ते समजुन घेणे गरजेचे आहे.

*© 2024, SK Publisher All Rights Reserved*

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 193-197

**पटकथा म्हणजे काय?**

पटकथा म्हणजे काय? पाहत असताना अनेक चित्रपट निर्माण करणाऱ्या विचारवंतांनी ज्या व्याख्या मांडल्या/लिहिल्या त्या खालीलप्रमाणे सांगता येतात.

१. चित्रपटाची ब्लू-प्रिंट म्हणजे पटकथा होय.( अलन अरमेर)

२. चित्रांच्या माध्यमातून कथा सांगणे. (सिड फिल्ड)

३. कलेच्या माध्यमातून एकमेकांच्या साह्याने संयुक्तपणे काम करण्यासाठीचे निमंत्रण; यात तीन बाबींचा सहभाग असतो- कल्पना, पात्र व रचना.- पौल श्रडेरा

४. दिग्दर्शकांची ब्लू-प्रिंट म्हणजे पटकथा,पटकथा ही कला नसून एक संयुक्तपणे केलेली प्रक्रिया होय. (लुईस नोव्रा)

५. पटकथा म्हणजे रचना होय. (विलियम गोल्डमन)

६. पटकथा म्हणजे एकविस दिवसात निर्माण होणारा दस्तऐवज होय. (विकी किंग)

७. पुढील पाच बाबी म्हणजे पटकथा. कथा निवड, पात्र, कल्पना, विस्तार, चित्र आणि संवाद. (लिंडा सेगर)

८. पटकथा म्हणजे या प्रक्रियेत सहभागी प्रत्येकासाठीची तंत्र शुद्ध मार्गदर्शक पुस्तिका होय. (लिंग आरोन्सेन)

वरील सर्व व्याख्या पटकथा म्हणजे काय? ते सांगतात. पटकथा हा लेखनाचा एक महत्वाचा प्रकार असून मूळ कथावस्तू जशास तशी ठेवून तिचे चित्रपटासाठी संवादात्मक व रचनात्मक रुपांतर केल्यानंतर जे स्वरुप तयार होते; त्याला ‘पटकथा’ म्हणतात.

कथालेखकाने कथा लिहिल्यानंतर पटकथालेखन या कथेचे संशोधन करून, कथा फुलवून, स्क्रिप्ट लिहून, पटकथा संवाद लिहून, आवश्यक तो बदल करुन, ती सुधारित कथा निर्माता, दिग्दर्शक यांच्यापर्यंत देणे गरजेचे असते. पटकथालेखकाचा सर्जनशील दिग्दर्शनावर, भावनिक प्रभावावर आणि निश्चितपणे तयार झालेल्या चित्रपटावर चांगला प्रभाव असतो.पटकथा लेखक एक तर ती कथा, चित्रपट कथा म्हणून निवडतो किंवा ती विकली जाईल या आशेने ती पटकथा मूळ कथावस्तू, कल्पना निर्मात्याला देतो. निर्माते एखादी कादंबरी, कविता, नाटक,गंमतीदार पुस्तक किंवा लघुकथा यासारख्या पटकथा लेखनाची कृती करमणूक उद्योगात अनेक रूपे धारण करते. बऱ्याचदा,एकाधिक लेखक वेगवेगळ्या कार्यासह, विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर समान स्क्रिप्टवर कार्य करतात; याच यशस्वी कारकीर्दीत,पटकथा लेखक, विविध भूमिकांमध्ये लिखाणासाठी नियुक्तही केले जाऊ शकतात.

चित्रपट लेखकांनी पटकथा लिहिण्यापूर्वी चित्रपटकथेच्या माध्यमातून खालील काही प्रश्नांचा विचार करणे आवश्यक आहे,तसेच पटकथेला शोभेल अशा उतरांनी पटकथेत त्याचा वापर करणेही गरजेचे आहे.

१. पटकथेतील केंद्रवर्ती भूमिका करणारे पात्र कोणते? त्याचे नाव काय?

२. हेच पात्र लेखकाला केंद्रवर्ती का वाटते? त्यातून प्रेक्षकांना कोणता प्रसंग दाखवायचा आहे किंवा ही कथा कशी पोहोचविता येईल?

३. या पात्रांची निर्मिती कशी करायची आहे? अर्थात प्रेक्षक भावनिकरित्या चित्रपटाशी एकरूप होण्यासाठी काय करता येईल?

४. पटकथेसाठी परिस्थिती, वातावरण व फार्म कसा असेल?

५. चित्रपटांमधील मुख्य पात्र अर्थात हिरो/हिरोईन यांना काय हवे? व ते त्यांना चित्रपटात शेवटी मिळविता येते किंवा नाही.

६. पटकथा लिहिण्यापूर्वी किमान सहा महिने चित्रपटाच्या कथेवर अभ्यास करणे आवश्यक असते. मग त्या कथेतील मुख्य व्यक्तिरेखांच्या सुरुवातीच्या भूमिका व त्यांना अपेक्षित असलेल्या त्या चित्रपटाचा शेवट लेखकाला मांडता आला पाहिजे,तो अनपेक्षित नसला पाहिजे.

७. हिरोला त्याच्या ध्येयापासून कोण बाजुला घालणार?

८. कथेतील मुख्य पात्राची स्थिती कशी/काय दर्शवता येईल?

९. कथेतील पहिल्या १० ते १५ पानांमध्येच प्रेक्षकांची पकड कशी घेता येईल? यासाठी लेखकाला काय- काय करता येईल?

१०. पुढे पेज २५ मध्ये कथेचा प्लॉट कसा असेल?

११. पटकथेचा मध्य काय असावा? यावेळी चित्रपटातील हिरोची स्थिती, गती काय असेल? तो त्याच्या ध्येयजवळ आहे की दूर आहे की यापैकी काहीच निश्चित नाही; याविषयीची माहिती लेखकाला असणे गरजेचे आहे.

१२. पटकथेचा भावनिक क्लायमॅक्स (Climax) कसा असावा?

१३. चित्रपटामध्ये येणारा खलनायक किंवा विरोधक कोण असावा? त्याचा तिरस्कार करणार असावा का? किंवा विरोधक म्हणून विरोधाला विरोध करणारा असावा की त्याचा अजून काही हेतू आपणास दाखवायचा म्हणून तो हिरोला विरोध करणार का? याविषयीचे ज्ञान लेखकाला असणे आवश्यक आहे.

१४. जो ही खलनायक किंवा विरोधक आपण लेखक म्हणून दाखविणार त्याची नेमकी पार्श्वभूमी काय असावी? तसेच हिरो व खलनायक यांचा तुलनात्मक फरकही समोर ठेवलेला असावा किंवा संवादामध्ये तो दर्शविता येईल काय? तशी माहिती लिखाणात नमूद करावी.

१५. कथेतील आवडती गोष्ट कोणती? आणि ती इतर बघणाऱ्या लोकांनाही आवडेल का?

१६. प्रेक्षकाची सुरुवात, मध्य व शेवटच्या भावना कशा असतील? यासाठी लेखकास भावनिक प्रसंगाचे योग्य नियोजन करणे आवश्यक असते.

यासोबतच पटकथा लिहिताना खालील काही बाबींचा अभ्यास करणेही गरजेचे आहे.

**पटकथा मसुदा/संहिता:**

पटकथाकाराने पटकथा लिहून पूर्ण झाल्यानंतर तिची संहिता निर्माता, दिग्दर्शक, कलाकार व प्रोडक्शन यांच्याकडे जाणार म्हणून इ.बाबींकडे लक्ष देणेही आवश्यक आहे. पटकथा शक्यतो A4 साईज पेपरवर दोन्ही बाजूस, पुरेसा समास सोडून, टाईप करून घेतलेली असावी. या संहितेत ६० ते ८९ दृश्य किंवा १०५ ते १२० पाने असावीत.पटकथा व्यवस्थित टाईप करून घेऊन, समोरच्याला वाचताना त्रास होणार नाही; याची खबरदारी घ्यावी. पटकथा लिहिण्यापूर्वी किंवा लिहिल्यानंतर स्क्रीन रायटर्स असोशिएयनकडे नोंदणी करून घेणे आवश्यक असते. त्याशिवाय तिची कोणी चोरी करणार नाही, याची दक्षता घेणेही गरजेचे असते.

**पटकथा संकल्पना,निर्मिती प्रक्रिया आढावा:**

पटकथा संकल्पना प्रवास पहात असताना किंवा चित्रपटाची पटकथा लिहिताना खालील पायऱ्या किंवा बाबींचा समावेश होतो.

**संकल्पना:**

१ ते ३ वाक्यात मुख्य पात्र व त्याची भूमिका म्हणजे संकल्पना होय;यालाच Premise ही म्हटले जाते.

**सिनोप्सिस:**

हा तीन परिच्छेदाचा असून यात कथेची सुरुवात, मध्य व शेवट याविषयी माहिती असावी.

**आराखडा:**

१ किंवा ३ पांनामध्ये मांडणी, विकास आणि पात्रांची भूमिका व त्यांच्या बाह्यरुपाबद्दल माहिती देण्यात यावी.

**मुख्यपात्रांची माहिती:**

मुख्य पात्राबाबत १ ते ३ पानांमध्ये त्यांच्या भूमिकेबाबत माहिती देणे आवश्यक असते.

**पौच दस्तऐवज:**

यामध्ये वरील सर्व घटकांचा समावेश करता येईल.

**विस्तारित माहिती:**

२० ते ४० पानांमध्ये प्रत्येक सीन, त्यातील पात्रे, संवादरहित कथा याविषयी माहिती विस्ताराने देणे आवश्यक असते.

**दृश्य विभागणी:**

यात प्रत्येक सीनमधील मुद्द्यांची यादी तयार करण्यात आलेली असते; त्यासाठी इंडेक्स कार्डचा वापर करता येतो.

**संवाद:**

यामध्ये मुख्य पात्राने बोलावयाचा एक पानभर संवाद रचना तयार केलेला असतो;ज्यामुळे कथेतील शैलीची जाणीव होते.

पटकथा सुरूवात कशी व कुठून करावी?:

पटकथाकाराला नेहमी डोक्यात प्रश्न पडत असतो;तो म्हणजे पटकथेची सुरुवात कशी व कुठून करायची? पटकथा लेखनासाठी अनेक जण एक विशिष्ट रचना लक्षात घेऊन लिहायला सुरुवात करतात पण पटकथा लेखन कुठून सुरु करावे? याविषयी विचार करत राहतात.पटकथा ही कुठूनही सुरू करता येते,जसे की एखादी छान कल्पना जर आपणास सुचली असेल किंवा एखादे नाविन्यपूर्ण पात्र भेटले असेल किंवा एखादा महत्त्वपूर्ण प्रसंग डोक्यात असेल तर पटकथा सहज लिहिता येते. शिवाय पटकथा लेखकाला एखादी नाविन्यपूर्ण कल्पना सुचली, कथेतील मध्यवर्ती पात्र किंवा एखादी घटना सुचणे यावरून पटकथेचा विस्तार करता येतो. विनोद, गंभीर, साहसी, गुन्हेगारी किंवा रोमँटिक अशा कोणत्याही प्रकारावर लेखक पटकथा लिहिण्यासाठी तयार असतो व यातून ती पटकथा तो लेखक पूर्णही करू शकतो. त्यांने ठरविलेल्या विषयावर पटकथेसाठी त्याला मुख्य पात्र,विरोधी पात्र यांचा वापर व्यवस्थित करणे आवश्यक असते.

**समारोप:**

वरील सर्व घटकांचा अभ्यास हा पटकथा लेखकाला करणे आवश्यक आहे. पटकथा निर्मितीची प्रक्रिया वरील सर्व बाबींमुळे सुलभ होते. तसेच पटकथा संकल्पना व इतर बाबीही लक्षात येतात.

**निष्कर्ष:**

१. कथालेखक हा उत्तम पटकथा लेखक होऊ शकतो.

२. पटकथा लिहिताना पटकथेची संकल्पना समजून घेणे आवश्यक असते.

३. पटकथा कुठून सुरू करता येते याविषयीचे ज्ञान घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. चित्रपट:एक कला, विजय दिक्षित- रेणुका प्रकाशन, पाहिली आवृत्ती- १९७९.

२. विषय चलचित्र: सत्यजित राय- अनु. विलास गीते. साकेत प्रकाशन, पाहिली आवृत्ती- १९९०.

३. Screenplay : The Foundation of Screen writing ,by syd Field,A Delta Book,New York – 2018.

:::. Cite this article .:::

घुगे, डॉ. संगीता. (2024). पटकथा निर्मिती प्रक्रिया. Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 193–197.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.42